महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## "उपकेंद्र सहाय्यक" पदाकरिता जाहिरात क्र. ०५/२०१९ ची निवड यादी

१) महावितरण कंपनीमध्ये **"उपकेंद्र सहाय्यक"** या संवर्गाची रिक्त पदे भरण्याकरीता तीन वर्षाच्या निश्चित कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने उमेदवारांची निवड करण्याकरीता जाहिरात क्र. ०५/२०१९ ही माहे जुलै २०१९ मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली होती. जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २६/०७/२०१९ अशी होती.

२) सदर जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची वस्तुनिष्ठ स्वरुपाची ऑनलाईन क्षमता चाचणी दिनांक २५/०८/२०१९ रोजी घेण्यात आली.

३) उमेदवारांच्या आवेदनाच्या संदर्भात उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील माहितीच्या आधारे उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेस बसण्यास अनुमती देण्यात आली होती. तथापि, जाहिरातीमधील शैक्षणिक अर्हता, अनुभव व उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे पात्र उमेदवारांची IBPS या स्वायत्त संस्थेकडून प्राप्त झालेली निवड यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

४) ऑनलाईन अर्जामध्ये नोंदविलेल्या नोंदीसंबंधी दस्ताऐवज/दाखले छानणीकरीता सादर करणे सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची आहे. ऑनलाईन अर्जामधील व जाहिरातीमधील अर्हतेबाबत नमूद केलेली कागदपत्रे ज्या दिवशी कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल त्या दिवशी उमेदवार आवश्यक कागदपत्रे सादर करु शकले नाहीत तर त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल आणि त्यास उमेदवार सर्वस्वी जबाबदार राहील.

५) उमेदवारांना ज्या ठिकाणी आवश्यक असेल असे अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. जाहिरातीमधील अनुभवाची अर्हता पूर्णपणे सिध्द करण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. अनुभवाच्या बाबतीत अनुभवाचे प्रमाणपत्र सिध्द करण्याकरीता इतर बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

६) निवड झालेल्या उमेदवारांना नेमणुकीकरिता हक्क म्हणून सांगता येणार नाही. उमेदवाराची निवड ही जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हता, अटी व शर्तींच्या अधीन राहून केवळ तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर कंपनीच्या प्रचलित नियमानुसार "यंत्रचालक" या नियमित पदावर सामावून घेण्यात येईल.

७) **निवड प्रक्रिया ही औद्योगिक कामगार न्यायालय, याचिका क्र. ४८/२०१२ व मा. उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठामध्ये याचिका क्र. २२३३८/२०१९, क्र. ९६७३/२०१९, क्र. ६४९६/२०१९ व संलग्न याचिका तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठामध्ये दाखल झालेल्या याचिका क्र. ७०३८/२०१८, क्र. ५३१०/२०१९ व क्र. ५४२/२०१८ च्या आदेशाच्या/निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.**

८) **शासन निर्णय दिनांक ०५/१२/२०१८ च्या अनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या विशेष अनुमती याचिका क्र. १५७०१/२०१९ च्या निर्णयाच्या अधीन राहून निवड यादी प्रसिध्द व कार्यान्वीत करण्यात येत आहे. प्रस्तुत पदाची निवड यादी आरक्षणाच्या व इतर अन्य मुद्याच्या संदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.**

९) **निवड झालेल्या उमेदवारांचे दस्ताऐवज/कागदपत्रे छानणी केल्यानंतर जे उमेदवार पात्र होतील, अशा उमेदवारांना तीन वर्षाच्या निश्चित कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीवर "उपकेंद्र सहाय्यक" म्हणून नेमणूक देण्यात येईल.**

१०) कोव्हिड -१९ या विषाणूचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यामध्ये दिनांक २२ मार्च, २०२० पासून व दिनांक २५ मार्चच्या नंतर लागू झालेल्या टाळेबंदीमुळे (लॉक डाऊनमुळे) बहुतांश जिल्हे, महानगरपालिका इ. मध्ये जिल्हा प्रवेश बंदी व संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. तसेच शासनाकडून सार्वजनिक, वैयक्तिक वाहतुकीस मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत.

११) कोव्हीड-१९ चा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून कार्यालयामध्ये, सार्वजनिक ठिकाणी सामाजिक अंतर रोखण्यासाठी (Social distancing) घ्यावयाच्या दक्षतेबाबत मार्गदर्शक सूचना वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

१२) **उपरोक्त अनु. क्र. १०, ११ मधील नमूद बाबीचा विचार करता, फक्त निवड झालेल्या उमेदवारांची (Select list) त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये नोंदी / अर्हता संबंधिताच्या प्रमाणपत्रांची छाननी माहे जुलै २०२० मध्ये करण्यात येईल. सदरची कागदपत्रांची छाननी उमेदवारांच्या सोयीकरीता शक्यतो उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या रहिवासाच्या जिल्ह्याच्या ठिकाणी परिमंडळ/मंडल कार्यालयामध्ये करण्यात येईल. तसेच याबाबत विस्तृत माहिती महावितरणच्या संकेतस्थळावर (www.mahadiscom.in) माहे जुलै २०२० मध्ये प्रसिध्द करण्यात येईल. याकरीता निवड झालेल्या उमेदवारांनी वेळोवेळी कंपनीच्या संकेतस्थळाचे अवलोकन करावे.**

१३) सदर पदासाठी प्रत्येक प्रवर्गाकरीता निवड झालेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (Cut off Marks) तसेच सर्व उमेदवारांना ऑनलाईन क्षमता चाचणीमध्ये प्राप्त झालेले गुण पहाणेसाठी URL लिंक कंपनीच्या संकेतस्थळावर माहे जुलै २०२० मध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल.

१४) **कागदपत्रे पडताळणीकरीता निवड यादीतील उमेदवारांनी नमूद केलेल्या दिवशी व संबंधित ठिकाणी/परिमंडळ/मंडल कार्यालयामध्ये हजर राहाणे अनिर्वाय राहील. जे उमेदवार कागदपत्रे पडताळणीकरीता हजर राहणार नाहीत त्यांना भविष्यात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही अथवा त्यांच्या निवेदनाची दखल घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.**

१५) उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीसाठी स्वखर्चाने यावे लागेल आणि कोणताही प्रवास खर्च/भत्ता दिला जाणार नाही.

१६) निवड झालेल्या उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर कागदपत्रे पडताळणीच्या वेळापत्रकाबाबतची माहिती पाठविण्यात येईल. सदर उमेदवारांनी ई-मेल आयडीचे अवलोकन वेळोवेळी करावे.

१७) निवड न झालेल्या उमेदवारांना महावितरण कंपनीकडून कोणताही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१८) **निवड झालेल्या उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे मूळ कागदपत्रे व स्वसाक्षांकीत केलेले छायांकीत प्रतींसहीत कागदपत्रे तपासणीसाठी हजर रहावे :-**

i) ऑनलाईन फॉर्म (ज्या उमेदवाराकडे ऑनलाईन अर्जाची प्रत उपलब्ध नाही अशा उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीच्या ठिकाणी सदर ऑनलाईन फॉर्मची प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल.)

ii) एस.एस.सी. गुणपत्रक व प्रमाणपत्र.

iii) आय.टी.आय. प्रमाणपत्र (Electrician/Wireman) / सेंटर ऑफ एक्सलन्स (Electrical Sector) प्रमाणपत्र व राष्ट्रीय व्यवसाय प्रमाणपत्र इत्यादी.

iv) शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अन्वये राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी पूर्ण झाल्यानंतर वीजतंत्री/तारतंत्री व्यवसायातील अथवा सेंटर ऑफ एक्सलन्स (Electrical Sector) मधील राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्लीकडून देण्यात येणारे प्रमाणपत्र.

v) राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी पूर्ण झाल्यानंतर संबंधित वीजतंत्री/तारतंत्री व्यवसायातील अथवा इलेक्ट्रीकल सेक्टरमधील विद्युत क्षेत्रातील दोन वर्षाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र.

vi) जातीचे प्रमाणपत्र.

vii) जातीचे वैधता प्रमाणपत्र (वैधता प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांनी जाती वैधताबाबतची सोबत जोडलेल्या यादीतील नमूद केलेले कागदपत्रे सादर करावी.)

viii) शासन निर्णय दिनांक १५/०७/२०१४ अन्वये ईएसबीसी प्रवर्गाकरीता देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे एसईबीसी वर्गातील आरक्षणाकरीता ग्राह्य धरण्यात येतील.

ix) आर्थिक दुर्बल घटकांसाठी शासन निर्णय दिनांक १२/०२/२०१९ अन्वये विहित करण्यात आलेले सक्षम प्राधिकाऱ्याचे पात्रता प्रमाणपत्र.

x) समांतर आरक्षणाच्या पृष्टयर्थ सक्षम प्राधिकाऱ्याकडून विहित केलेले प्रमाणपत्र. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जामध्ये एक किंवा एकापेक्षा जास्त समांतर आरक्षणाची नोंदी केली असल्यास त्या सर्व प्रकारच्या समांतर आरक्षणाचे विहित केलेले प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

xi) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंनी ऑनलाईन अर्जामध्ये एकापेक्षा जास्त खेळाच्या प्राविण्य प्रमाणपत्राबाबत नमूद केले असल्यास उमेदवाराने सर्व खेळांचे प्राविण्य प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

xii) प्राविण्यप्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णय दिनांक ०१ जुलै, २०१६ व दिनांक ११ मार्च, २०१९ अन्वये क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असलेबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेला खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणी अहवाल, कागदपत्रे पडताळणी दिवशी सादर करणे अनिवार्य आहे अथवा क्रीडा अर्हतेनुसार सदर पदासाठी अर्ज करताना खेळाडूने उप संचालक/क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्रमाणपत्र पडताळणी करुन मिळणेबाबत केलेल्या अर्जाची पोच पावती सादर करावी. अन्यथा सदर उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

xiii) अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

xiv) सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र.

*****

**सोबत : -**

**निवड यादी**

**प्रतिक्षा यादी**

**जातवैधता प्रमाणपत्राकरीता आवश्यक कागदपत्रांची यादी**